MHRG190008272023

:: <u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ११४/२०१५ मधील निशाणी क्र.२० वरील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे सामनेवाला क्र.१ व २ यांनी त्यांचेविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करणेबाबत विनंती केली.

०२. अर्ज व अर्जदाराने दिलेले म्हणणे वाचले. सामनेवाला व अर्जदार यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. सामनेवाला क्र.१ व २ चे कथन की, प्रस्तुत अर्जाचे कामी परिच्छेद निहाय माहिती प्राप्त झाल्यानंतर सदर विषयाबाबत अधिक माहिती मिळविणे आवश्यक होते तसेच सरकारी वकीलांबरोबर चर्चा होणे जरुरीचे होते. तसेच काही महत्वाची कागदपत्रे मिळविण्यास उशीर झाला, इत्यादी कारणामुळे कैफियत मुदतीत दाखल करता आली नाही करिता न्यायालयाने दिनांक २१.०७.२०२२ रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आला आहे. सामनेवाला क्र.१ व २ यांना कैफियत दाखल न झाल्यास शासनाचे मोठया प्रमाणावर नुकसान होणार असल्यामुळे झालेला आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०४. अर्जदाराने सामनेवाला क्र.१ व २ च्या प्रस्तुतच्या अर्जास सक्त हरकत नोंदवुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

दिनांक १५.०१.२०२६

०५. अर्ज, अर्जाला दिलेले म्हणणे व परस्पर विरोधी युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुत अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.१ व २, तसेच अर्जदार यांचे प्रस्तुत वादामध्ये आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्याचे स्पष्ट होते. सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जात हजर होऊन मुदतीत कैफियत का देता आली नाही, याबद्दल दिलेले अर्जामधील कारण संयुक्तीक आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.१ व २ यांना त्याची बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. सामनेवाला क्र.१ व २ विरुध्द प्रकरण विना कैफियत चालविण्याचा झालेला आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्जाचा निकाल गुणदोषावरुन उभय पक्षातील वादाला पुर्णविराम मिळेल. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: आदेश ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ व २ विरुध्द दिनांक २१.०७.२०२२ रोजी पारित झालेला विनाकैफियत आदेश रद्द करण्यात येतो व अर्जास कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.16 10:49:05 +0530

महाड,
दिनांकः१५.०१.२०२६

(**श्रीमती एच. आर. जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड

दिनांक १५.०१.२०२६